# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१४२** **दिनांक - १३/०४/२०२४**

## ४,५०,०००/- रु किंमतीची १८ ग्रॅम गर्द पावडर (हेरॉईन) अंमली पदार्थ पकडण्यास भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री करणारे तसेच बाळगणारे व्यक्तीचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कारवाई करणे बाबत मा.वरीष्ठांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या होत्या

त्याअनुषंगाने मा.पोलीस उपायुक्त,परिमडंळ -१, सहाय्यक पोलीस आयुक्त,भाईंदर विभाग यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ,अवैध दारु विक्री तसेच गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असतांना भोला नगर जवळ, जे.पी इन्फ्रास्ट्रक्चरचे पुढे,मुकुंदम बिल्डींगचे समोरील बाजुस,भांईदर (प),जि-ठाणे येथे इसम नामे १) गौतम रमेशचंद्र गुप्ता वय-३० वर्षे,व्यवसाय-रिक्षाचालक,रा- रुम नं ९, गल्ली नं १३,शिवमंदिराच्या मागे,भोला नगर,भांईदर(प),जि-ठाणे २) सचिन उर्फ बटला राधेश्याम गुप्ता वय-२३ वर्ष व्यवसाय-मजुरी रा- रुम नं ९,गल्ली नं १३,शिवमंदिराच्या मागे,भोला नगर,भांईदर(प),जि- ठाणे हे इसम गौतम रमेशचंद्र गुप्ता याचे मालकीचे रिक्षा क्रमांक एम.एच ०४ के.ए ९६५३ मध्ये संशयितरित्या असतांना मिळुन आले त्यांची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता इसम नामे गौतम रमेशचंद्र गुप्ता याचे शर्टाचे डावे बाजुचे खिश्याचे आतील बाजुस असलेल्या चोर खिश्यामध्ये पारदर्शक प्लास्टिकचे पाउचमध्ये ४,५०,०००/- रुपये किमंतीचा १८ ग्रॅम वजनाचा गर्द पावडर (हेरॉईन) हा अंमली पदार्थ,रिक्षा,मोबाईल व रोख रक्कम असा एकुण ५,६१,४२०/- रु. किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन तो जप्त करणेत आला आहे.

नमुद आरोपीतांविरोधात भाईदर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र १५८/२०२४ कलम ८(क),२१(ब) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करणेत आली आहे. सदर गुन्हयाचा तपास, भाईंदर पोलीस ठाणे हे करीत आहे.

वरील कामगिरी श्री प्रकाश गायकवाड,.पोलीस उपायुक्त परीमडंळ -१,श्रीमती दिपाली खन्ना,सहाय्यक पोलीस आयुक्त सो,भाईंदर विभाग,व.पो.नि सुर्यकांत नाईकवाडी,पो.नि विवेक सोनवणे (गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि योगेश देशमुख,गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.हवा/०७१२० राजेश श्रीवास्तव,पो.हवा/०६२९७ रविंद्र भालेराव, पो.हवा/०७१४५ किरण पवार,पो.ना/९७०१० रामनाथ शिंदे,पो.शि/ १००३८ संजय चव्हाण यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.